आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

५ ऑक्टोबर २०२४ - शनिवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार असल्याचं प्रधानमंत्र्यांचं प्रतिपादन
- महाराष्ट्रात वाशिम इथं २३ हजार कोटी रुपयांच्या कृषी आणि पशुसंवर्धन उपक्रमांचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ
- मालदीवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मुइज्जू आजपासून पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर
- हमास दहशतवादी संघटनेनं इस्राएल वर हल्ला केल्याला आज एक वर्ष पूर्ण

**आणि**

- मुंबईत चेंबूर इथं एका इमारतीला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातल्या ७ जणांचा मृत्यू

**<><><><><>**

केंद्र सरकारचा प्रत्येक निर्णय आणि धोरण विकसित भारताचं ध्येय पूर्ण करण्यासाठी समर्पित असून शेतकरी हा या दृष्टिकोनाचा मुख्य आधार आहे, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी काल महाराष्ट्रात वाशिम इथं एका कार्यक्रमात केलं. कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्राशी संबंधित जवळपास २३ हजार कोटी रुपयांच्या उपक्रमांचा प्रारंभ प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते. भटक्या जमाती आणि समुदायांच्या विकासासाठीही सरकार वचनबद्ध असल्याचं ते यावेळी म्हणाले. वाशिम जिल्ह्यातल्या पोहरादेवी इथं बंजारा समाजाच्या समृद्ध परंपरेचं दर्शन घडविणाऱ्या बंजारा विरासत संग्रहालयाचं उद्घाटनही काल प्रधानमंत्र्यांच्या हस्ते झालं. या संग्रहालयाबद्दल अधिक माहिती आमच्या वाशिमच्या वार्ताहराकडून

**होल्ड--व्हाईस कास्ट-वाशिम**

यावेळी मोदींच्या हस्ते शेतकरी सन्मान निधीच्या १८ व्या हप्त्यापोटी सुमारे २० हजार कोटी रुपयांची रक्कम देशभरातील जवळपास साडे नऊ कोटी शेतकऱ्यांना वितरित करण्यात आली. त्याचवेळी राज्याच्या नमो शेतकरी महासन्मान योजनेअंतर्गत १९ शे कोटी रुपयांच्या मदतीचंही राज्यातल्या ९० लाख शेतकऱ्यांना त्यांच्या हस्ते वाटप करण्यात आलं. **<><><><><>**

एक देश एक निवडणूक पद्धतीचा  भारताला खूप मोठा फायदा होईल असं प्रतिपादन माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांनी केलं आहे.  ते काल नवी दिल्ली एक देश एक निवडणूक या विषयावर ३० व्या लाल बहादूर शास्त्री स्मृती व्याख्यानात बोलत होते. एक देश एक निवडणूक पद्धतीमुळे उत्तम प्रशासन, धोरणात्मक स्थिरता, सामाजिक एकोपा, आर्थिक वाढ आणि जागतिक स्पर्धात्मकता वाढेल असंही कोविंद यांनी यावेळी सांगितलं. एकाच वेळी निवडणूक घेतल्यास अधिक समावेशक आणि समृद्ध भविष्यासाठी मूलभूत सुधारणा होण्यास मदत होणार आहे. कोविंद यांच्या नेतृत्वाखालील समितीने या संदर्भातील अहवाल नुकताच राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्याकडे सादर केला होता.

**<><><><><>**

जम्मू काश्मीरमध्ये येत्या मंगळवारी मतमोजणी होणार असून मतमोजणी सुरळीत पार पडण्यासाठी सर्व केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. मतमोजणी केंद्रावर पिण्याचे पाणी आणि स्वच्छता गृह अशा अत्यावश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. याशिवाय आपत्कालीन परिस्थितीसाठी अग्निशमन दल आणि वैद्यकीय कर्मचाऱ्यांना तैनात करण्यात आलं आहे. कलम ३७० रद्द केल्यानंतर जम्मू काश्मीरमध्ये होणारी ही पहिलीच निवडणूक

आहे. या निवडणुकीचं मतदान तीन टप्प्यांत मतदान झालं असून तिन्ही टप्प्यांमध्ये एकूण ६३ पूर्णांक ८८ शतांश टक्के इतकं मतदान झालं आहे.

**<><><><><>**

हरियाणा विधानसभा निवडणुकीची मतमोजणी मंगळवारी होणार आहे. हरियाणा विधानसभा निवडणुकीसाठी काल सुमारे ६७ टक्के मतदान झालं. विधानसभेच्या ९० जागांसाठी एकाचं टप्प्यातलं मतदान शांततेत झालं.

**<><><><><>**

केंद्रीय नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी आजपासून जर्मनीच्या तीन दिवसीय दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यादरम्यान ते हॅमबर्ग इथं दोन दिवसीय शाश्वतता परिषदेत सहभागी होणार आहेत. शाश्वत विकास, ग्रीन हायड्रोजन, कमी व्याजदराने वित्तपुरवठा आणि अक्षय ऊर्जा क्षेत्रात सहकार्य वाढवण्याबाबत ते जर्मनी आणि युनायटेड किंगडमच्या मंत्री आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत द्विपक्षीय बैठका घेणार आहेत. भारत-जर्मनी संबंध मजबूत करणे, व्यावसायाच्या संधी निर्माण करणे आणि अक्षय ऊर्जेच्या विस्ताराला गती देणे हे या भेटीचं उद्दिष्ट आहे.

**<><><><><>**

कमी अंतरावर लक्ष्य़भेद करण्यासाठीच्या ४ क्षेपणास्त्रांची चाचणी काल राजस्थानात पोखरण इथं यशस्वी झाली. गेल्या दोन दिवसांमध्ये ही चाचणी पार पडली. या चाचणीमधून या क्षेपणास्त्रांची विविध प्रकारे मारा करण्याची क्षमता सिद्ध झाल्याचं संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे. ही क्षेपणास्त्रं डीआरडीओच्या प्रयोगशाळेत तयार केलेली स्वदेशी संरक्षण प्रणाली आहे, असंही संरक्षण मंत्रालयाने म्हटलं आहे.

क्षेपणास्त्रांची चाचणी यशस्वी केल्याबद्दल संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी डीआरडीओ, लष्कर आणि या चाचणीत सहभागी असणाऱ्या सर्वांचं अभिनंदन केलं

आहे. या क्षेपणास्त्रांमुळे सशस्त्र दलांची तांत्रिक बाजू भक्कम होईल, असं राजनाथ सिंह म्हणाले. डीआरडीओचे प्रमुख समीर कामत यांनीही क्षेपणास्त्रांच्या चाचणीबद्दल डीआरडीओच्या वैज्ञानिकांचं अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

मालदीवचे राष्ट्रपती डॉ मोहम्मद मुइज्जू आजपासून  पाच दिवसांच्या भारत दौऱ्यावर येणार आहेत. या दौऱ्यात ते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. त्याचबरोबर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याशी तसंच परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांच्याशी द्विपक्षीय, प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या आंतरराष्ट्रीय मुद्द्यांवरदेखील ते चर्चा करणार आहेत. मुईज्जू या दौऱ्यात आग्र्याला भेट देणार असून बेंगळुरू आणि मुंबई इथं विविध कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

<><><><><>

गाझा पट्ट्यात हमास या अतिरेकी संघटनेनं इस्त्राईलवर हल्ला केला त्यास आज एक वर्ष पूर्ण होत आहे. या हल्लयात इस्त्राईलच्या  १२०० नागरिकांचा मृत्यु झाला होता. तेव्हापासून पश्चिम आशियामध्ये युद्धाचा भडका उडालेला आहे. त्यात आतापर्यंत ४१ हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी जीव गमावला आहे. संयुक्त   राष्ट्र संघाचे महासचिव एंटोनियो गुटेरेस यांनी हमास संघटनेनं ओलीस ठेवलेल्या इस्त्रायली  नागरिकांची विनाशर्त सुटका  करण्याचं आवाहन केलं आहे. या युद्धामध्ये आता लेबनॉनसह इराणही सहभागी झाल्यामुळं त्याची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालल्यामुळे संयुक्त   राष्ट्र संघानं चिंताही व्यक्त केली आहे.

<><><><><>

इस्त्राएलनं लेबनॉनवरचे हल्ले अधिक तीव्र केले आहेत. इस्त्राएलनं काल हिजबुल्लाह  आणि हमास यांना लक्ष्य करुन उत्तर लेबनॉन मधल्या पॅलेस्टिनी निर्वासितांच्या शिबिरावर बॉम्ब हल्ला केला. त्यामुळे लेबनॉन मधले पॅलेस्टिनी

निर्वासित आणि इतर   या भागातून पळ काढत आहेत. इस्त्राएलनं शुक्रवारी केलेल्या हल्ल्यात हिझबुल्लाहचा म्होरक्या सय्यद हसन नसरल्लाह ठार झाल्यानंतर त्याचा संभाव्य उत्तराधिकारी हाशेम सफीद्दीनचा देखील ठावठिकाणा नसल्याचं वृत्त प्रसारमाध्यमांनी दिलं असून एका हवाई हल्ल्यात तो आणि हिजबुल्लाहचे आणखी काही कमांडर्स ठार झाल्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.

दरम्यान, इस्त्राएलला केला जाणारा शस्त्रास्त्र पुरवठा थांबवण्याविषयी फ्रान्सचे अध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ यांनी केलेल्या वक्तव्याचा इस्त्राएलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतान्याहू यांनी निषेध केला आहे.

**<><><><><>**

आज जागतिक सेरेब्रल पाल्सी दिवस आहे. मेंदूतल्या रक्तपुरवठ्यातील बिघाडामुळे स्नायुंच्या हालचाली प्रभावित होणं अशा स्वरुपातील हा आजार आहे.या आजाराबाबत जागृती आणि पिडीतांबद्दल सहवेदना व्यक्त करणं  अशी  या दिवसाची संकल्पना आहे. यानिमित्ताने  देशभरात विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

**<><><><><>**

मुंबईत चेंबूर इथं एका इमारतीला लागलेल्या आगीत एकाच कुटुंबातल्या ७ जणांचा मृत्यू झाला. यात ३ लहान मुलांचा समावेश आहे. या दोन मजली इमारतीच्या तळाला असलेल्या एका दुकानात चुकीच्या पद्धतीने केलेल्या विजेच्या वायरिंगमुळे ही आग लागल्याचं समजतं. या दुर्घटनेत होरपळलेल्यांना रुग्णालयात नेलं, मात्र, त्यांचा मृत्यू झाल्याचं रुग्णालयानं जाहीर केलं. याबाबत अधिक तपास सुरू आहे.

**<><><><><>**

संयुक्त अरब अमिरातीत  सुरू असलेल्या महिलांच्या २० षटकांच्या विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारताचा सामना पाकिस्तान संघाविरुद्ध दुबईत होणार आहे.

दुपारी साडेतीन वाजता हा सामना सुरू होईल. विजेतेपदाच्या शर्यतीत राहण्यासाठी भारतीय संघाला आज विजय मिळवणं आवश्यक आहे.